**न्यायदंडाधिकारी(प्रथम श्रेणी) भिवापूर, जि.नागपूर यांचे न्यायालयात.**
**( पिठासीन अधिकारी वि. सं. डामरे )**

**संक्षिप्त फौ.ख.क्र. ०१/२०१८**　　**नि.क्र.१० खाली**
CNR NO-MHNG17-000001-2018

**महाराष्ट्र शासन**
व्दारा पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन, भिवापूर,
ता. भिवापूर, जिल्हा–नागपूर　　...　**फि र्या दी**

– वि रु द्ध –

**विनायक गोविंदा नगराळे,**
वय ५२ वर्षे, व्यवसाय: मजुरी,
रा. डोमा, ता. चिमूर,
जि. चंद्रपूर　　...　**आ रो पी**

.......................................................................................................
मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये
शिक्षेस पात्र गुन्हयाकरीता.
.......................................................................................................
श्री. के.जी.कन्नाके विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता–अभियोग पक्षातर्फे
श्री. पी. एल. नागोशे विद्वान विधिज्ञ – आरोपीकरीता
.......................................................................................................

**न्या य नि र्ण य**
( दिनांक २७ ऑगस्ट, २०१८ रोजी पारीत)

आरोपी विरुध्द मुंबई दारूबंदी अधिनियमचे कलम ६५ (ई) नुसार दंडनीय अपराध केल्याच्या आरोपावरून संपरीक्षा चालविण्यात आली.

२)	अभियोग पक्षाचे कथन व आरोपीचा बचाव यावरून माझे खालील बाबी विचारार्थ आल्या. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **मु द दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दि. १३/०८/२०१७ रोजी २०.१० ते २०.४० वा. च्या सुमारास मौजा खोलदोडा शिवार, भिवापूर च्या हद्दीत आरोपीने त्यांच्या ताब्यात प्रत्येकी १८० मिलीच्या एकूण ४८ देशी दारूच्या निपा विनापरवाना अवैधरित्या विक्री करण्याच्या उददेशाने बाळगतांना मिळून आला आणि मुंबई दारु बंदी अधिनियमचे कलम ६५(ई) नुसार गुन्हा केला? | .. | नकारार्थी |
| २. आदेश काय ? | .. | अंतिम आदेशाप्रमाणे |

३)	आरोपीवरील आरोप सिध्द करण्याच्या दृष्टीने अभियोग पक्षाने साक्षीदार, चंद्रभान दुलाराव सावसाकडे (सा.क्र.१) यांची साक्ष नि.क्र.१० वर नोंदविली. निशाणी क्र.१ वर सव्विस्तर आदेश करून सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपी विरुध्द पुरेसा पुरावा आढळून न आल्याने, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ चे बयानातून वगळण्यात आले.

**<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>मुददा कं. १ करिता</u> :**

४) अभियोग पक्षाचे साक्षीदार, चंद्रभान(सा.क्र.१) हा पंच साक्षीदार असून त्याने त्याचे साक्षीत सांगीतले की, तो शेतावर जात असतांना आलेसुर फाटयाजवळ पोलीसांनी त्याची सही घेतली होती. पोलीसांनी त्याचे समक्ष कुठलिही कार्यवाही केली नाही. पंचनाम्यातील मजकुर त्याला माहित नाही. अभियोग पक्षातर्फे साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आले. परंतु, साक्षीदाराने त्यास सहकार्य केले नाही. अभियोग पक्षाला वारंवार संधी देवून सुध्दा तपसा अधिकारी व इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. खटल्यातील फिर्याद व घटनास्थळ पंचनामा सिध्द झाला नाही. त्यामुळे, उपलब्ध साक्षीदाराचा साक्षीपुरावा आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्यास पुरेसा नाही.

५) अभियोग पक्षाला घटनेच्या वेळेस आरोपीच्या ताब्यात दारु असल्याचे सिध्द करणे आवश्यक आहे. तसेच, अभियोग पक्षाला जप्त झालेली मालमत्ता दारु असल्याचे रासायनिक विश्लेषण अहवालाच्या आधारे सिध्द करणे बाध्य आहे. जप्त मालमत्ता व विश्लेषीत मालमत्तेचा संबंधही प्रस्थापीत करणे जरुरीचे आहे. जप्त मुद्देमाला पैकी १८० मिली. वेगळी काढून रासायनिक विश्लेषणासाठी पाठविले. परंतू रासायनिक विश्लेषणाबाबत अहवाल आजपर्यत न्यायालयात दाखल करण्यांत आला नसल्याने रासायनिक विश्लेषण अहवाला अभावी असे म्हणता येणार नाही की, आरोपीकडून जप्त केलेला मुद्देमाल ही दारु होती. अभियोग पक्षाचे साक्षीदार व दस्तऐवज यांच्यातील विसंगती व कार्यकारणभाव जुळत नसल्यामुळे आरोपींनी त्यांच्या ताब्यात अवैधरित्या व विनापास परवाना देशी

दारुच्या ४८ निपा बाळगतांना मिळाल्याचे अभिलेखावरील साक्षीपुराव्यावरुन संशयापलीकडे सिध्द होत नाही. करीता मी मुदद्‌ा क्र.१ करीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवितो.

६) **<u>मुदद्‌ा क्र. २ करीता</u>** :

वरील सर्व विवेचनावरून मुदद्‌ा १ सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. करिता मुद्‌दा क्र.२ चे निष्कर्षात खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **<u>आ दे श</u>**

१) आरोपी **विनायक गोविंदा नगराळे,** यास मुंबई दारूबंदी अधिनियमचे कलम ६५ (ई) या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २५५(१) प्रमाणे दोषमुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपीचे जामीनपत्र व बंधपत्र रद्‌द करण्यात येत आहेत.

३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम ४३७(अ) च्या तरतुदीनुसार वरीष्ठ न्यायालयातील अपिलामध्ये किंवा न्यायनिर्णयाविरुध्द याचीकेमध्ये नोटिस निघाल्यानंतर हजर राहण्याकरीता पुढील सहा महिन्यापर्यंत कायम राहिल असा वैयक्तीक जातमुचलका न्यायनिर्णय घोषीत करण्या अगोदरच दिले आहे.

४) खटल्यातील जप्त देशी दारूच्या बाटल्या अपील कालावधीनंतर योग्य त्या कायदेशीर विल्हेवाटीसाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग उमरेड यांचेकडे पाठविण्यात याव्यात.

५) खटल्यातील जप्त मोटरसायल क्र.एमएच-३१ /डीक्यु- ३६८२ आवाहन कालावधीनंतर, वाहनाच्या नोंदणिकृत मालकास परत करण्यात यावी.

६) न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आला.

Sd/-
( वि. सं. डामरे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
भिवापूर

भिवापूर.
दि. २७/०८/२०१८

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File of judgment are word to word as per original judgment.

Name of Stenographer : **Ravindra W. Vindane**,
to C.J.J.D. & J.M.F.C., Bhiwapur